चित्रपट निर्माते गजानन जागीरदार

यांच्यावर बुद्धिवाद्यांनी केलेला अन्याय



प्र. ९ चित्रपट निर्माते गजानन जागीरदार

यांच्यावर बुद्धिवाद्यांनी केलेला अन्याय

रूढ विज्ञानाच्या नियमात न बसणाऱ्या घटना घडणे अशक्य आहे असे मानणे याला बुद्धिवाद म्हणता येईल. (निदान स्वतला बुद्धिवादी म्हणवून घेणारे असे मानतात.) अशी घटना घडणे शक्य आहे असे मानणे ही मग अंधश्रद्धा ठरते. या निकषानुसार समाजात अंधश्रद्ध लोकांची संख्या प्रचंड आहे असे मानावे लागेल. याला शास्त्रज्ञही अपवाद नाहीत. नव्हे, आईन्स्टाइनसारखे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञही याला अपवाद ठरू शकत नाहीत. १९५५ साली 'अमेरिका सायकॉलॉजिकल असोसिएशन' च्या मानसशास्त्रज्ञ सदस्यांच्या याविषयीच्या मतांचे सर्वेक्षण केले असता ९१ टक्के मानसशास्त्रज्ञ सदस्यांनी रूढ विज्ञानाच्या नियमात न बसणाऱ्या (अतींद्रिय) घटना घडणे शक्य असल्याचे आपले मत नोंदविले. एका विज्ञानसंघात जर रूह विज्ञानाच्या नियमात न बसणाऱ्या घटनांवर विश्वास

असणाऱ्यांची इतकी मोठी टक्केवारी आढळून येत असेल, तर समाजातील सामान्य जनतेत ती किती आढळेल याची कल्पना सहज करता येईल.


हे लोक आपले अनुभव गुप्त का ठेवतात?

कोणतेही मत अनुभव आल्याशिवाय कोणी बनवत नाही. रूढ विज्ञानाच्या नियमात न बसणाऱ्या घटनांचा अनुभव आल्याशिवाय त्या घटना शक्य असल्याचे मत कोणी नोंदविणार नाही. निदान असे अनुभव आलेल्या जवळच्या व्यक्तींचा परिचय तरी त्यांना असला पाहिजे असे म्हणावे लागते. असे अनुभव आलेल्या व्यक्तींची संख्याही प्रचंड असल्याशिवाय त्यावर विश्वास असणाऱ्यांची संख्या इतकी मोठी असणार नाही, हे उघड आहे. असे अनुभव आलेले लोक इतक्या मोठ्या संख्येने असतील तर आपला अनुभव जाहीर करणाऱ्यांची संख्याही मोठी असावयास पाहिजे. पण ती तशी दिसत नाही. आपला अनुभव हे लोक गुप्त का ठेवतात ? असा यावर कोणी प्रश्न विचारील. याला उत्तर 'तशी संधी त्यांना मिळत नाही' हेच आहे. खासगीत ते आपला अनुभव सांगत असतातच. तसा प्रसंग उद्भवला तर ते आपला अनुभव जाहीरपणेही सांगायला मागेपुढे पाहत नाहीत असे आढळून आले आहे. याचे एक अलीकडे घडलेले प्रसिद्ध उदाहरण म्हणजे महाराष्ट्र विधानपरिषदेचे भूतपूर्व सभापती व प्रसिद्ध विचारवंत दिवंगत वि. स. पागे यांनी आपणाला आलेल्या एका चमत्काराच्या अनुभवाचे एका जाहीर सभेत केलेले कथन हे होय. हा अनुभव त्यांनी संत फुटाणे यांच्या कऱ्हाड येथील जाहीर सत्कार समारंभात यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत १९८३ च्या नोव्हेंबरमध्ये सांगितला. 'हा अनुभव इतर कुणी सांगितला असता तर मी त्याला वेड्यात काढले असते' असे यावर यशवंतराव म्हणाले. हा चमत्कार संत फुटाणे आणि पागे या दोघांच्या समक्ष पंढरपुरात घडला होता व तो सांगण्यास संत फुटाणे यांचा जाहीर सत्कार समारंभ ही योग्य संधी आहे असे वाटल्यामुळे पागे यांनी तो सांगितला. '[1]हा अनुभव ३५ वर्षे आपण गुप्त ठेवला व आता ज्याची आपण आजन्म भक्ती केली त्या पांडुरंगाच्या साक्षीने तो सांगत असून

---

[1] १. याविषयीच्या सविस्तर माहितीसाठी विज्ञान आणि चमत्कार प्रकरण ८ पाहा.

आम्ही खोटे बोलत असू तर नरकात जाऊ' असेही यावेळी पागे म्हणाले. ' या चमत्कारावर बुद्धिवाद्यांचा विश्वास बसणार नाही म्हणून त्यांनी अशी ही शपथ घेतली




हे उघड आहे. एरव्ही खासगीत त्यांनी हा अनुभव कथन केला असता तर अशी शपथ घेतली नसती आणि खासगीत हा अनुभव आपल्या जवळच्या अनेक लोकांना त्यांनी सांगितलाही असलाच पाहिजे. खुद्द संत फुटाणे यांनी प्रस्तुत लेखकाला आपला अशाच चमत्काराचा आलेला आणखी एक अनुभव खासगीत सांगितला आहे. तो चमत्कार आपल्याच नव्हे तर इतरांच्याही समक्ष घडल्याचे त्यांनी सांगितले आहे. चमत्कारांचे अनुभव आपण समजतो तितके विरळा नाहीत, किंबहुना त्यांची रेलचेल आहे ही गोष्ट यावरून स्पष्ट होईल. म्हणून रूढ विज्ञानाच्या नियमांच्या पलीकडे काही घड़ शकत नाही हे म्हणणे टिकण्यासारखे नाही. अशा घटनांवर विश्वास ठेवणे ही अंधश्रद्धा आहे हा वाद शुद्ध अडाणीपणाचा व आडमुठेपणाचा आहे. याला बुद्धिवाद म्हणायचे झाले तर तो वाद करणारी बुद्धी स्वतःच आंधळी आहे असे म्हटले पाहिजे.

गजानन जागीरदारांना आलेला अनुभव

अशाच प्रकारचा एका चमत्काराचा अनुभव प्रसिद्ध सिने-दिग्दर्शक गजानन जागीरदार यांना आपल्या जीवनात आला आणि तो त्यांनी आपल्या 'पाऊलखुणा' या आत्मचरित्रात कथानकाच्या ओघात सांगितला. त्याची चैतन्य देशमुख नावाच्या लेखकाने कोल्हापुरच्या 'पुढारी' दैनिकातून 'मरता क्या नहीं करता' या मथळ्याच्या लेखाने जाहीर वाच्यता केली. संपादकांनी त्या लेखावर वाचकांच्या प्रतिक्रिया मागविल्या. मात्र त्या मागवताना 'आपण या घटनेकडे बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहत असून वाचकांनीही तसेच पाहावे असे आवाहन केले एवढ्यावरच न थांबता `त्यांनी

अंधश्रद्धानिर्मूलनाचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्याकडून या घटनेची बुद्धिवादी उकल करणारा एक लेख मुद्दान लिहून घेऊन प्रसिद्ध केला. दाभोळकरांचा हा लेख म्हणजे विज्ञानाच्या रूढ नियमांच्या चौकटीत ही घटना ओढून ताणून बसविण्याचा एक आडदांड प्रयत्न असून तो लिहून व प्रसिद्ध करून अनुक्रमे दाभोळकर आणि 'पुढारी' चे संपादक यांनी गजानन जागीरदारांवर घोर अन्याय केला आहे. तो कसा केला आहे, हेच येथे त्या लेखाची शास्त्रीय निकषाच्या आधारे छाननी करून दाखवून द्यावयाचे आहे. त्यासाठी प्रथम जागीरदारांना कोणता अनुभव आला है। वाचकांना कळण्यासाठी त्यांच्या 'पाऊलखुणा' या आत्मचरित्रातील संबंधित भाग पूर्ण उद्धृत करीत आहे -

'जागीरदारांची एका चमत्काराची 'पाऊलखुण'



'उमाजी नाईक' पूर्ण व्हायला अजून दीड दोन लाख रुपये तरी लागणार होते, पण मफतलालने ऐन अडचणीच्या वेळी मला दिलेले चार हजार रुपये आभाळातून पडल्यासारखे होते. घरातील दिवाळी तर बिनबोभाट साजरी झाली. ती दिवाळी साजरी झाली. नंतर १९५० साल उजाडलं, तरी 'उमाजी नाईक' अपुरा राहणार, या चित्रपटाबद्दल आपण उभारलेले मनोरथ धुळीला मिळणार या जाणीवेनं मी निराश,

उदास झालो. याच वेळी नर्गिस, देवआनंद, ही जोडी घेऊन एक दर्जेदार हिंदी चित्रपट मी दिग्दर्शित करावा अशी योजना घेऊन 'नोबल पिक्चर्स'चा मालक माझ्याकडे आला. त्यानं भरपूर रक्कमही मला देऊ केली. आमचे करारमदार झाले, तरी पण मला नेहमीसारखा उत्साह वाटेना. त्याचं कारण अर्धवट स्थितीत अडकून पडलेला उमाजी नाईक. मी माझ्या निर्मात्या मित्रापुढे माझं मन उघड केलं आणि तो म्हणाला, "अर्धवट राहिलेल्या चित्रपटासाठी फायनान्स मिळणं अवघड आहे, पण एका निराळ्या मार्गानं मी तुमचा प्रश्न सोडवू शकेन. "

त्यानं काशीहून मुंबईस प्रकृतीच्या कारणांसाठी आलेल्या त्याच्या मांत्रिक मित्राचा उल्लेख केला. आणि त्याच्याकडून माझं काम होईल, असा विश्वासही व्यक्त केला. जादू-टोणा, गंडेदोरे, तांत्रिक-मांत्रिक यांच्यावर माझा फारसा विश्वास नव्हता. आणि त्यांच्यात तथ्य असलं तरी त्याचा उपयोग करून घेण्यासाठी माझं मन धजेना. तरी पण 'मरता क्या नहीं करता' या म्हणीला अनुसरून मी त्या मांत्रिकाचं सहाय्य घ्यायचं ठरवलं.

पत्राशीकडे झुकलेले पंडित शर्मा आपली विद्या कलकत्त्याला प्राप्त करून काशीला स्थायिक झाले होते व हार्टची बिमारी असल्यामुळे ते औषधोपचारासाठी मुंबईला आले होते. त्यांनी मोठ्या आपुलकीनं माझं स्वागत केल. एक ताईत मंत्रून दिला व त्याचबरोबर काही अटीही पाळायला सांगितल्या. आणि सांगितलं की दहा दिवसांनी म्हणजे महिन्याच्या सतरा तारखेला माझं काम होईल. मी आता अजिबात काळजी करायची नाही, असंही त्यांनी बजावलं.

तो ताईत घेऊन मी मोठ्या आशेने घरी गेलो. दोन तीन दिवसांनी मनसुखलाल शेटकडून अनपेक्षित अशा काही हालचाली सुरूही झाल्या. पण सतरा तारीख उलटली तरी प्रत्यक्ष काही घडलेच नाही, शेवटी मी पंडितजींना भेटायला गेलो. संध्याकाळची वेळ. खोलीत आम्ही दोघंच होतो, पंडित शर्मा आणि मी. एका लोखंडी कॉटवर पथारी टाकून भिंतीजवळ लोडाला टेकून पंडितजी बसले होते. त्यांच्या पलंगाजवळ एक छोटेसे गोल टेबल होते. त्यावर इष्ट देवतेची छोटीशी पानाफुलांनी जवळ-जवळ झाकलेली अशी मूर्ती होती. तिथून थोड्याच अंतरावर एक लोखंडी फोल्डिंग खुर्ची होती. मी त्या खुर्चीवर बसलो होतो. पंडितजींच्या हातात मी परत केलेला ताईत होता.

एकाग्रतेने ते त्याच्याकडे बघत होते, मुठीत धरून ती मूठ मिटत होते. उघडत होते. विचारात मग्न होते.

थोड्या वेळाने त्यांनी मान वर केली व मला दाराला कडी लावून परत खुर्चीवर येऊन बसायला सांगितले. "आता पुन्हा एकदा सांगा नक्की काय घडलं ते. बारीक सारीक गोष्टीसुद्धा न विसरता सांगायच्या !" मी सांगू लागलो, "तुम्ही मला हा ताईत दिला. सांगितलं की दहा दिवसांनी म्हणजे सतरा तारखेला माझे काम फत्ते होईल आणि मला पाहिजे असलेले दीड लाख रुपये शेटजींकडून मला मिळतील. चौदा तारखेपर्यंत काही घडलं नाही. पंधरा तारखेस सकाळी मला शेटजींच्या मुनीमजीचा फोन आला, की शेटजी मला भेटायला माझ्या घरी येऊ इच्छितात. दुपारी चारला येऊ देत काय? मी होकार दिला. त्याप्रमाणे आले. म्हणाले, कुणीतरी तुमच्याबद्दल माझा गैरसमज करून दिला होता, की मी दिलेले पैसे तुम्ही पिक्चरसाठी वापरीत नसून दुसरीकडे गुंतवीत आहात, म्हणून मी तुम्हाला दोन लाख रुपये दिल्यानंतर पुढचे पैसे देण्याचे थांबवले. बारकाईने तपास केल्यानंतर माझा गैरसमज दूर झाला. माझी खात्री झाली की, तुम्ही आपलं इमान राखून काम केलंत. मी दिलेला सर्व पैसा पिक्चरमध्ये खर्च केला. वर शिवाय पंचवीस-तीस हजार रुपये पदरचेच खर्च केलेत. आपल्या दोघांत वितुष्ट यावं, म्हणून तुमच्याच काही 'हितचिंतकांनी' माझे कान भरले. पण आता माझा संशय दूर झाला आहे. तुम्हाला पाहिजे असलेले दीड लाख रुपये मी एका रकमेनं तुम्हाला द्यायला तयार आहे. गेले दोन-तीन महिने तुमचे त्रासात गेले, पण आता झाले गेलं विसरून जा आणि नेटानं कामाला लागून पिक्चर पूर्ण करा. माझी तब्बेत बरी नसते. त्यासाठी मी इंग्लंडला जाऊन इलाज करून घेणार आहे. पुढल्या आठवड्यात जायचं ठरतं आहे. त्याआधी तुमचं काम करून देतो. बोला कधी येता ?"

हे ऐकून मी सर्दच झालो. शर्टाच्या बाहेरील दंडावरील ताईतावर हात ठेवला व परमेश्वराचे आभार मानून मी कधी त्यांच्याकडे यावं, हे शेटजींनाथ विचारलं. ते म्हणाले, 'परवा आमच्या सॉलिसिटरच्या ऑफीसमध्ये चार वाजता या. तिथं कागदपत्रांवर सही करून आपले पैसे घेऊन जा.' त्यादिवशी सतरा तारीख येत होती हेही माझ्या दृष्टीने महत्त्वाचं होतं.

" सतरा तारखेला काय झालं ?"

त्या दिवशी ठरल्याप्रमाणे मी शेटजींच्या सॉलिसिटरकडे चार वाजता पोचलो. काही वेळानं मला आत केबिनमध्ये बोलविण्यात आलं. सॉलिसिटर ओळखीचे झाले होते. त्यांनी हसत माझं स्वागत केलं. ड्रॉवरमधून टाईप केलेले दस्तऐवज काढले व माझ्यासमोर ठेवीत म्हणाले, "हे तुमचे कागद सहीसाठी तयार आहेत, पण दहा मिनिटांपूर्वीच शेटजींचा फोन आला, की आज सह्या करायच्या नाहीत. पुन्हा तुम्ही कधी यायचं हेही निश्चित नाही. आज शेटजींची तब्येत जास्त बिघडली, असं समजतं." मी घरी येऊन त्यांच्या पेढीवर फोन केला. त्यांची प्रकृती ठीक नसल्याचं मला सांगण्यात आल.

"शेटजी पंधरा तारखेला तुमच्याकडे येऊन गेले. तेव्हापासून ते सतरा तारखेला तुम्ही सॉलिसिटरकडे गेलात तो काळ, महत्त्वाचा आहे. त्या काळात काय घडलं, ते नीट आठवा. आणि मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं नि:संकोचपणे मला द्या. काही लपवायचं नाही. आता सांगा, या काळात तुमच्याकडून काही प्रमाद घडला काय ?"

" नाही. तुमच्या सांगण्याप्रमाणे मी आवर्जून व्रतस्थ राहिलो होतो. "

"काही अभक्ष्यभक्षण. मांसाहार वगैरे ?"

"नाही. तसा मी सवयीनं शाकाहारी आहे... अरे खरंच.. !

सोळा तारखेला संध्याकाळी एका पार्टीला गेलो होतो, तिथे मटण कबाब खाल्ले होते खरे !"

"बस्स ! तिथंच घोटाळा झाला !"

पण मांसाहार करायचा नाही असं मला सांगितलं नव्हतं !

ते राहिलं खरं सांगायचं, माझंच चुकलं. बरं हरकत नाही. आपण सुधारून घेऊ ती चूक, पंडितजींनी मूर्तीच्या शेजारी ठेवलेली एक वीतभर उंचीची समई लावली. दहा-बारा उदबत्त्यांचा जुडगा पेटवून तो एका पात्रात खोवला व मूर्तीला नमस्कार करून काही मंत्र पुटपुटायला सुरुवात केली. दोन मिनिटांनी डोळे उघडून ते मला

म्हणाले, "आता अगदी एकाग्र चित्त करून, डोळे मिटून बसून राहा. थोड्या वेळानं तुमच्या चेहऱ्यावर थरथरल्यासारखी संवेदना जाणवेल. तेव्हा डोळे उघडून मला हाक मारा." मी तसं केलं. पाच-सात मिनिट गेली, तरी काहीच घडेना. डोळे उघडून तसं सांगायचा विचार मी करीत होतो, इतक्यात....

एखाद्या तगड्या फुटबॉल प्लेयरने बाजूने येऊन माझ्या खुर्चीच्या मागच्या पायांवर जोराची लाथ मारावी, तसं झालं. खुर्ची मागच्या भिंतीवर जाऊन आपटली व मी, त्याचवेळेला बसल्या अवस्थेतच जमिनीवर आदळलो. (जाड ठसा ओकांनी केला.)मी पंडितजीकडे पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावर भीतीची छटा तरळून गेली. स्वतला सावरीत किंचित स्मित करून ते म्हणाले, "उठा, घाबरू नका. सारं काही ठीक होईल. ती खुर्ची उचलून परत पहिल्या ठिकाणी ठेवा अन् बसा. तिच्यावर इष्ट देवाचा कोप झालाय. आपण त्यांना शांत करू. "

माझं अंग थरथर कापत होतं. अंगात ताप भरला असावा असं वाटलं. पण त्या परिस्थितीतून बाहेर पडल्यास दुसऱ्या कोणत्या आपत्तींना तोंड द्यावं लागेल, कुणास माहीत, कळत नकळत ज्या अदृश्य शक्तीच्या वाटेला भी गेलो होतो ती शांत झाल्याखेरीज इथून जाणे आत्मघातकीपणाचं होतं, हे नक्कीच. मुकाट्यानं उठून खुर्ची जाग्यावर ठेवली आणि धडधडत्या छातीनं आसनस्थ झालो.

पंडितजी म्हणाले, "जागीरदारजी, तुम्ही तुमचं चित्त ठिकाणावर आणल्याखेरीज मी काहीच करू शकत नाही. इष्टदेवतेला शांत करण्याचा मी प्रयत्न करीन. पण त्यासाठी मला तुमचं सहकार्य हवं." मी माझ्या मनाची समजूत घातली. या प्रसंगातून सहीसलामत बाहेर पडायचं असेल, तर मन घट्ट करायला हवं. परतीच्या वाटा बंद झाल्या आहेत आता पुढं जाण्याशिवाय - गत्यंतर नाही. त्यावेळी लगेच आठवलेला मंत्र - गायत्री मंत्र मी मनाशी म्हटला आणि एक दीर्घ श्वास घेऊन पंडितजीच्याकडे स्थिर नजरेनं पाहू लागलो.

पंडितजी म्हणाले, 'ठीक! आता मघाशी केलं तसंच पुन्हा करा. **चेह-यावरच्या स्नायूमध्ये थरथरल्यासारखं होईल, तेव्हा मला लगेच सांगा.' पाच मिनिटं झाली असतील, नसतील, की माझ्या चेहऱ्यात स्पंदने सुरू झाली. मी माझे दोन्ही हात**

आपल्या गालांवर वट्ट दाबून ठेवले तरी ती थांबेनात. मी जवळ जवळ ओरडूनच म्हणालो, 'पंडितजी !' त्यांच्या सांगण्यावरून मी डोळे उघडले. त्यांचा चेहरा घामानं डबडवला होता. पण त्यावर समाधान दिसत होतं.

मला त्यांनी शेजारी बसवून घेतलं. माझ्या पाठीवरून हात फिरवत, थकलेल्या पण उत्साही आवाजात ते म्हणाले, "गेलं! तुमच्या माझ्यावरचं से सावट गेल.'

'भी अपराध कबूल केला, क्षमा मागितली आणि इष्टदेवतांना शांत केलं. आता ते प्रसन्न आहेत. तुमचं काम निश्चितच होईल. मी तुम्हाला दुसरा साईत करून देतो. काळजी घ्या. सारी पथ्यं सांभाळा. आज शुक्रवार आहे. पुढच्या शुक्रवारी आनंदाची बातमी घेऊन मला भेटायला या. उल्हसित होऊन मी तिथून परतलो. पुढच्या शुक्रवारची वाट पाहत.

इष्टदेवतेचा (की दैवताचा) वरदहस्त माझ्या शिरावर होता. आठवडाभर मला कडक शिस्त पाळायची होती. अदृश्याचा ताबा केवळ माझ्या कृतीवर नाही, उक्तीवर नाही, तर माझ्या विचारापर्यंत पोचू शकत होता. मी नजरकैदेत असल्यासारखा होतो. एकांतांतही मी एकटा नव्हतो. सतत सावलीसारखं माझ्या मागावर कुणीतरी असल्याची जाणीव मला होई. अंधारातही ही सावली मला सोडत नसे.

'जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती - चालविशी हाती धरोनिया !" असं म्हणणाऱ्या संत कवीला अदृश्याचा आधार वाटे. या उलट म**ला सोबतीचं दडपण जाणवे कुठून या फंदात पडलो? कुठून दुर्बुद्धी झाली, असं झालं मला.** तसा मी देवभोळा नाही, की अंधश्रद्ध नाही. याबाबत माझे विचार हे मोघम आणि लवचिक आहेत. देव दिसत नाही, म्हणून तो नाहीच असं म्हणायला माझे मन तयार नाही, तरी देवदर्शनाला मुद्दाम म्हणून कधी जात नाही. सहज मित्रांच्या बरोबर देवळात गेलो, तर नमस्कार केल्याशिवाय राहवत नाही. धार्मिक विधी करण्यात मला रस नाही. असे प्रसंग शक्यतोवर मी टाळतो, पण माझ्या नकारानं माझ्या आप्तांचं मन दुखावलं जात असेल तर त्यांच्या समाधानासाठी सोवळे नेसून गुरुजींच्या प्रॉम्प्टिंगनुसार मंत्रोच्चार करतो. विधिपूर्वक साऱ्या हालचाली करतो. शेवटी उठताना मनप्रूर्वक नमस्कार करतो आणि आतल्या आत, आपल्या अपुरेपणाबद्दल खेद करतो. एखाद्या भूमिकेशी

समरस न होता कधी कधी नुसती वेळ निभावून न्यावी लागते. त्यावेळेस जसं वाटतं, तसंच अशा सोपस्कारांच्या वेळी वाटतं.

तरी पण, राहून राहून माझ्या मनात येत होतं, की आपल्या फायद्यासाठी आपण एका तांत्रिकाचा उपयोग करून घेत आहोत, हे नीतिबाह्य तर नाही? असलं तंत्र वापरून आपण कोणाला लुबाडत तर नाही? कुणावर अन्याय तर करत नाही? माझ्या विवेक बुद्धीनं उत्तर दिलं, की मी गूढं मार्गानं जरी आपली अडचण दूर करीत असलो, तरी दुसऱ्याचा घात करीत नाही. ज्या दीड लाखासाठी मी धडपड करीत होतो, ते माझ्या हक्काचे होते, मला ते न देण्यात मनसुखलाल शेटनी माझा घात केला होता. त्यांची चूक मी सुधारत होतो. शिवाय ही रक्कम मला भरमसाठ व्याज देऊन परत करावी लागणार होतीच. यात नैतिक बाजू माझीच होती.

दोन चार दिवसांतच नियतीची चक्रं फिरू लागली. मनसुखलालकडून बी. के. पटेल हे गृहस्थ मला येऊन भेटले. त्यांची माझी पूर्वीपासूनची ओळख होतीच. ते स्वतः चित्रपटांना फायनान्स करीत असत. त्यांनी मला सांगितलं, की मनसुखलाल आजारी असतात. त्यांना आपला व्याप कमी करायचा आहे. पटेलांनी 'उमाजी नाईक' या चित्रपटाचा व्यवहार मनसुखलालकडून विकत घेतला असून चित्रपट पुरा करण्यासाठी लागणारे दीड लाख रुपये पटेल स्वतःदेतील. मात्र ते एका रकमेनं न देता पन्नास हजारांच्या तीन हप्त्यात देतील.

या योजनेला माझी हरकत नव्हती. नवीन करारमदार झाले. पंडिजींनी सांगितलेल्या शुक्रवारच्या आत पन्नास हजार रुपये माझ्या खाती बँकेत जमा झाले. चित्रपट पुरा करण्याच्या तयारीला मी लागलो. पंडितजींना मी हे सांगितलं आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना चौपाटीवर घेऊन गेलो. सूर्यास्ताची वेळ होती. दंडावर बांधलेला ताईत हातात घेऊन समुद्राला अर्पण करण्यास त्यांनी मला सांगितलं. आणि ते केल्यानंतर समुद्राकडे पाठ करून परत तिकडे न बघता सरळ त्यांच्याकडे येण्यास त्यांनी मला बजावलं. ते गाडीतच बसून राहिले. मी त्यांच्या आदेशाचं पालन करून परतलो आणि त्यांना नमस्कार करून दक्षिणेसंबंधी विचारलं. पंडितजी अतिशय आनंदात होते. ते म्हणाले, "तुमचं काम माझ्या हातून झालं, यातच मला माझी दक्षिण मिळाली. मी तुमचे पिक्चर्स आवर्जून बघत असतो. तुमच्या कलेचा मी निस्सीम

चाहता आहे. आयुष्यात कधीही अडचण आली, तर माझ्याकडे या आणि तुमची सेवा करण्याची मला संधी द्या.' "

मंत्रातंत्रावर विश्वास ठेवायचा का?

वरील उतारा 'मरता क्या नही करता' या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात देऊन देशमुख या लेखकाने 'जागीरदार दुतोंडी आहेत, दांभिक आहेत असे कोणीच म्हणणार नाही' हे आपले मत नोंदवले आहे. पण मग त्यांचा अनुभव प्रमाण मानायचा तर मंत्रतंत्र, गंडेदोरे, ताईत इ. गोष्टींवर विश्वास ठेवावा लागेल, अशी अडचण बुद्धिवाद्यांपुढे उपस्थित केली आहे. त्या अडचणीचे निराकरण दाभोळकर प्रभृती बुद्धिवाद्यांनी करावे असे शेवटी लेखकाने आवाहन केले आहे.

'**पुढारी'** च्या संपादकांचा दाभोळकरांना लेखासाठी तगादा लागल्यावर दाभोळकरांनी "मला लिहायचा उत्साह नव्हता' असे म्हणून त्याचे कारण सांगताना "अशा घटनातील कार्यकारणभावावर आधारित असे उत्तर देणे अवघड असते" अशी स्पष्ट कबुली आपल्या '**अंधश्रद्धा विनाशाय**' या पुस्तकातील यावरील प्रकरणात दिली आहे. पण जागीरदारांप्रमाणेच 'मरता क्या नही करता' अशी त्यांची अवस्था पुढारीच्या संपादकांनी करून ठेवली असल्यामुळे जागीरदारांनी अनुभवलेल्या चमत्काराच्या जीवघेण्या हल्ल्यातून बुद्धिवादाला वाचविण्यासाठी त्यांनी रात्रभर जागून जिवाच्या आकांताने हा लेख लिहिला. पण जागीरदारांनी पथ्य न पाळल्यामुळे जशी आपटी खाल्ली, तशी आपटी हा लेख लिहिताना वैचारिक प्रामाणिकपणाचे व शास्त्रीय निकषाचे पथ्य न पाळल्यामुळे दाभोळकरांनीही खाल्ली आहे. पण याची ना त्यांना जाणीव आहे, ना **पुढारी**च्या संपादकांना. मग वाचकांना ती कुठून असणार?

या घटनेतील मुख्य प्रसंग

जागीरदारांना आलेल्या अनुभवाची बुद्धिवादी संगती लावण्यासाठी दाभोळकरांनी त्या घटनेतील नऊ मुद्दे बाजूला काढून त्यांची संगती लावण्याच प्रयत्न केला आहे. पण चमत्काराच्या दृष्टीने यातील तीनच मुद्दे वा प्रसंग महत्त्वाचे आहेत. ते असे -

(१) जागीरदारांना मंत्रविद्याविशारद पंडित शर्मा यांनी त्यांची एक मोठी अडचण दूर करण्यासाठी एक ताईत मंत्रून दिला व त्यांची अडचण १० दिवसांत (१७ तारखेपर्यंत) मिटेल असे सांगितले. आठव्या दिवशी (म्हणजे १५ तारखेला) मनसुखलाल जागीरदारांना पैसे घेऊन जायला सांगण्यासाठी त्यांच्या घरी स्वतःमुद्दाम आले. हा चमत्कार पाहून जागीरदार सर्दच झाले, त्यांनी दंडावरील ताइतावर हात ठेवून परमेश्वराचे आभार मानले. पण पथ्य न पाळल्यामुळे जागीरदारांचे काम झाले नाही.

(२) काय चुकले हे पंडित शर्माना प्रथम कळले नाही. कारण त्यांनी जी पथ्ये पाळावयास सांगितली होती, त्यामध्ये मांसाहार वर्ज्य करण्याचे पथ्य सांगितले नव्हते. चूक हुडकून काढण्यासाठी काय काय घडले हे सविस्तर कथन करण्यास त्यांनी जागीरदारांना सांगितले. त्यावेळी पंडित शर्माना मांसाहाराचे कारण सापडले व त्यांनी ते पथ्य सांगितले नाही ही आपली चूक होती हे मान्य केले. पण त्यामुळे इष्ट देवतेचा कोप झाला होता. तो पंडित शर्मानी जागीरदारांच्या सहकार्यांने नाहीसा केला. यावेळी जागीरदार बसलेली खुर्ची एकदम मागे जाऊन जागीरदार खाली आदळण्याचा चमत्कार घडला. चेहऱ्यावर स्पंदने होण्याचा चमत्कारही याचवेळी घडला.

(३) पंडित शर्मानी पुन्हा पथ्य सांगून ताईत मंत्रून दिला व आठ दिवसात निश्चित काम होईल असे सांगितले. त्याप्रमाणे आठ दिवसांत जागीरदारांना हव्या असलेल्या रकमेचा पहिला हप्ता मिळाला. (नंतर बाकीचे हप्ते मिळून त्यांचे काम झाले.)

या तीन प्रसंगातील बुद्धिवादात न बसणाऱ्या घटना म्हणजे -

(१) मंत्रित ताइताचा सांगितलेल्या मुदतीत दृश्य परिणाम दिसून येणे,

(२) माणूस बसलेली खुर्ची ढुंगणाखालून एकदम निसटून मागे जाणे.

(३) चेहऱ्यावर स्पंदने होणे व दोन्ही हात गालावर दाबून धरले तरी ती न यांबणे.

आता या तीन घटनांची दाभोळकर बुद्धिवादी दृष्टिकोनातून कशी उपपत्ती देतात हे पाहू.

दाभोळकरांच्या हवेतील वावड्या

(१) मंत्रित ताइताचा विशिष्ट अवधीत दृश्य परिणाम दिसून येणे बुद्धिवादात बसत नसल्यामुळे दाभोळकरांनी हवेत वावड्या उठविल्या आहेत. त्या अशा -" (जागीरदारांच्या) निर्मात्या मित्राची व मनसुखलाल शेटजींची ओळख होती का हे माहीत नाही. पण तो असण्याची शक्यता आहे. कारण एक सिनेव्यवसायाचा निर्माता व दुसरा फायनान्सरच होता. शेटजींचे गैरसमज आता राहिलेले नाहीत, ते जागीरदारांना पैसे देण्याच्या विचारात आहेत एवढे जर निर्मात्या मित्राला समजले असेल वा कुणकुण जरी लागली असेल, तरी ती निर्मात्या मित्रमार्फत शर्माला मिळणे हा तर्क सहजसंभाव्य आहे. "

कल्पनाविलासात दंग झालेले दाभोळकर हे विसरले की निर्मात्या मित्राला जर मनसुखलाल जागीदारांना पैसे देण्याच्या विचारात आहेत याची कुणकुण लागली असती, तर त्या मित्राने जागीरदारांना त्यांची आर्थिक अडचण सोडविण्यासाठी मांत्रिकाकडे जाण्याचा सल्ला का दिला असता? मनसुखलाल शेटजींची गैरसमजूत झाली होती. पण ती आता नाहीशी झाली असून ते आता जागीरदारांना पैसे देण्याच्या विचारात आहेत ही आनंदाची बातमी त्याने जागीरदारांना सरळ येऊन सांगितली असती. पण हा साधा विचार 'मरता क्या नही करता' या त्यांच्या मानसिक अवस्थेमुळे दाभोळकरांना सुचला नाही. त्यांनी नसलेले संबंध जोडून हवेत कल्पनेच्या वावड्या उडविल्या आहेत. दुसरे असे की मनसुखलाल शेटजीची आणि जागीरदारांच्या निर्मात्या मित्राची परस्पर ओळख असती, तर त्याने त्या ओळखीचा उपयोग जागीरदारांची आर्थिक अडचण सोडविण्यासाठी स्वतःच केला असता. (किंवा जागीरदारांनी रदबदली करण्यास त्या मित्राला विनंती केली असती.) त्यासाठी त्या मित्राने मांत्रिकाकडे जागीरदारांना पाठविले नसते व जागीरदारही गेले नसते. यावरून त्या मित्राची शेटजीशी ओळख नव्हती हे सिद्ध होते. पण समजा, त्याला शेटजीची ओळख होती, पण रदबदली करण्याइतकी चांगली ओळख नव्हती, तर मग त्या मित्राला शेटजी जागीरदारांना पैसे देणार असल्याची कुणकुण लागली असती तर

ती कुणकुण तो मित्र जागीरदारांना येऊन सांगेल की मांत्रिकाला जाऊन सांगेल? 'बुडत्याला काडीचा आधार' म्हणतात. पण येथे बुडणाऱ्या बुद्धिवादाला काडीचाही

आधार नसल्यामुळे तो कसा गटांगळ्या खात आहे, हे येथे उत्कृष्टपणे पाहावयास मिळते.

दाभोळकर हा वावड्या उडविण्याचा खेळ 'क्षणभर बाजूला ठेवून अन्य पर्यायांचा विचार येथून पुढे करतात. ते म्हणतात, "काय घडले असेल, कसे घडवले असेल हे समजण्यासाठी शक्याशक्यतेचा नियम (Law of Probability) समजून घ्यावयास हवा. या ठिकाणी जागीरदारांचेच उदाहरण घेऊन विचार करू. दोनच शक्यता आहेत. एक तर जागीरदारांचे काम होईल (वा अंशतःहोईल) वा होणार नाही. प्रत्यक्षात काम झाले नाही. त्याने शर्माचे काहीच बिघडविले नाही.' जागीरदारांचे काम झाले नाही या गोष्टीने शर्माचे काहीच बिघडविले नाही, हे दाभोळकरांचे विधान म्हणजे एक लोणकढी थाप आहे. शर्माचे काहीच बिघडले नसते, तर नंतरचे (जागीरदार खुर्चीवरून आदळणे इ.) प्रकरणच घडले नसते है स्पष्ट आहे. जागीरदारांचे काम झाले नाही म्हणूनच पुढच्या गोष्टी निस्तारण्याची जबाबदारी पंडित शर्मावर येऊन पडली. केवळ मांसाहार केल्याच्या गोष्टीवर खापर फोडून शर्माना मोकळे होता येत नव्हते, तर झालेल्या चुकीची दुरुस्ती करण्याची (इष्ट देवतेचा कोप घालविण्याची) आणि जागीरदारांचे काम होण्यासाठी पुन्हा नव्याने तरतूद करण्याची दुहेरी जबाबदारी त्यामुळे शर्मांवर येऊन पडली. तेव्हा शर्माचे काहीच बिघडले नाही ही दाभोळकरांची थाप असून, ती शर्माच्या ताइतात कसलेच मंत्र्यसामर्थ्य नसल्याचे वाचकांना पटावे म्हणून त्यांनी मारली आहे. त्यासाठीच त्यांनी येथे 'शक्याशक्यतेचा नियम आणून बसवला आहे. जागीरदारांचे काम होईल हा शर्माचा निव्वळ अंदाज असल्याचे त्या नियमांच्या द्वारा त्यांना दाखवून द्यावयाचे आहे. उदा. एखादे नाणे फेकले तर नाण्याच्या दोन बाजूंपैकी एक बाजू निश्चित वर येईल हे माहीत असते. पण कोणती बाजू वर येईल हे निश्चित माहीत नसते. अंदाजाने अमुक बाजू वर येईल असे भाकीत केले आणि योगायोगाने ती बाजू वर आली तर मंत्रशक्तीला त्याचे श्रेय मिळते व नाही आली तर 'मांसाहारा' सारख्या एखाद्या गोष्टीवर त्याचे खापर फोडून मोकळे होता येते, असा हा दाभोळकरांचा 'शक्याशक्यतेच्या नियमाचा युक्तिवाद आहे. पण मांसाहारावर खापर फोडून शर्मा मोकळे झालेले नाहीत, तर पुढची जागीरदारांची कामे यशस्वी करून देण्याची जबाबदारी स्वीकारून त्यांचे काम विशिष्ट अवधीत

(आठ दिवसांत) करून दाखवून ती जबाबदारी यशस्वीरीत्या पारही पाडली असल्यामुळे दाभोळकरांच्या 'शक्याशक्यतेच्या नियमा'चा फज्जा उडाला आहे. तीही त्यांची हवेतील वावडीच ठरली आहे.

जागीरदारांनी परमेश्वराचे आभार का मानले?

कित्येक महिने पैसे देण्यास टोलवाटोलव करणारे मनसुखलाल, इतकेच नव्हे तर, "या उप्पर माझ्याकडून तुम्हाला एक छदामही मिळणार नाही. किंबहुना मी गुंतविलेले पैसे तुम्ही कधी आणि कसे परत करणार याबद्दल मला लेखी उत्तर द्या." (पाऊलखुणा पृष्ठ २२५) असे जागीरदारांना खडसावणारे मनसुखलाल पंडित शर्मानी ताईत दिल्यानंतर केवळ आठ दिवसांनी जागीरदारांच्या घरी मुद्दाम 'पैसे घेऊन जा' हे सांगण्यासाठी आले हा त्या ताईताचा चमत्कार नव्हे काय? वरीलप्रमाणे खडसावणीचे उद्गार काढणारे मनसुखलाल मुद्दाम जागीरदारांच्या घरी येऊन 'पैसे घेऊन जा' 'कधी येता बोला' असे म्हणताच जागीरदार (त्यांच्याच भाषेत सांगायचे तर) 'सर्दच' झाले. त्यांनी दंडावरील ताइतावर हात ठेवला व परमेश्वराचे आभार मानले.

वरील घटना १५ तारखेला घडली. शेटजींनी १७ तारखेला पैसे घेऊन जाण्यास जागीरदारांना सांगितले होते. (तेही तुम्हीच तारीख सांगा असे जागीरदारांनी त्यांना म्हटल्यामुळे.) आश्चर्य म्हणजे पंडित शर्मानी दिलेलीच ही तारीख होती !

हीसुद्धा शर्माच्या ताइताच्या प्रभावाची निदर्शकच घटना नव्हे काय? या दोन दिवसातच म्हणजे १६ तारखेला जागीरदारांनी मांसभक्षण केले, आणि घोटाळा झाला. हे मांसभक्षण सुद्धा जागीरदारांनी आपण होऊन सांगितलेले नाही, तर शर्मानीच या दोन दिवसांत मांसभक्षण केले का, असा प्रश्न जागीरदारांना विचारला आणि जागीरदारांना १६ तारखेला आपण पार्टीला गेलो होतो व तेथे हे अभक्ष्यभक्षण केल्याचे आठवले. म्हणजे पंडित शर्मानीच जागीरदारांचे काम होण्यातील चूक हुडकून काढली होती. याला कुठल्या तरी गोष्टीवर खापर फोडणे म्हणता येणार नाही. म्हणून "जागीरदारांनी मांसाहार केला नसता तर दुसरे दिवशी दुसरे एखादे

पथ्य मोडल्याचे त्यांना शर्मानी सांगितले असते, " हे दाभोळकरांचे विधान सर्वथैव अस्थानी आहे. वर कथन केलेला घटनाक्रम पाहता जागीरदारांनी १६

तारखेला मांसाहार केला नसता तर १७ तारखेला त्यांचे काम निश्चित झाले असते असे म्हणता येते, कारण १७ तारखेला शेटजींनी सर्व कागदपत्र तयार ठेवले होते. फक्त जागीरदारांनी सही करण्याचा अवकाश होता. पण ही सही करण्याच्या दहाच मिनिटे अगोदर शेटजीची तब्येत बिघडली आणि त्यांनी फोन केला की आज सही करावयाची नाही. त्याला शेटजींनी कारणही सांगितले नाही. ही वस्तुस्थिती काय दर्शविते? हेच की जागीरदारांनी मांसाहार केला नसता तर कारण नसताना - कारण असते तर शेटजींनी ते सांगितले असते. (शेटजींनी आपली तब्येत बरी नसते असे स्वतःच जागीरदारांना १५ तारखेला सांगितले होते. तेव्हा शेटजींच्या तब्येतीचे कारण खरे नव्हते) कारण नसताना शेटजीनी सह्याचे काम पुढे ढकलले नसते. शिवाय त्यांनी आज सह्या करावयाच्या नाहीत एवढेच फोनवर कळविले होते. सह्याच करावयाच्या नाहीत असे कळविले नव्हते. म्हणजे जागीरदारांचे काम त्या दिवशी झाले नाही याला कसलेही बुद्धीला पटणारे कारण नव्हते. कसे असणार? मांसाहार हे बुद्धीला पटणारे कारण होऊ शकत नाही. हां, तंत्रशास्त्राच्या दृष्टीने ते कदाचित कारण होऊ शकेल. आणि पंडित शर्मा यांचे हेच म्हणणे होते.

या चुकीचा परिणाम मात्र तंत्रशास्त्राच्या दृष्टीने भयंकर झाला. जागीरदारांचे काम झाले नाहीच, पण जागीरदार खुर्चीवरून लाथ बसल्याप्रमाणे खाली आदळले. जागीरदारांच्या परतीच्या वाटा बंद झाल्या. इष्टदेवतेची त्यांना क्षमा मागावी लागली. कुठून या फंदात पडलो असे त्यांना झाले आणि पुन्हा मुकाटयाने कडक पथ्य पाळावे लागले. त्याचा मात्र इष्ट तोच परिणाम झाला. इष्ट देवतेचा कोप गेल्यामुळे त्यांचे काम शर्मानी दिलेल्या दुसऱ्या ताइतामुळे त्यांनी दिलेल्या आठ दिवसांच्या आतच झाले. "आज शुक्रवार आहे पुढच्या शुक्रवारी आनंदाची बातमी घेऊन या " हे त्यांचे म्हणणे खरे ठरले. शुक्रवारच्या आत त्यांच्या बँकेतील खात्यावर त्यांना हव्या असलेल्या रकमेचा पहिला हप्ता जमा झाला. हा चमत्कार पुन्हा दुसऱ्यांदा कसा झाला? येथे दाभोळकरांच्या 'शक्याशक्यतेच्या नियमा'चा पुन्हा फज्जा उडाला आहे.

संभवनीयता सिद्धांताविषयीचे दाभोळकरांचे घोर अज्ञान

(२) ज्याला दाभोळकर 'शक्याशक्यतेचा नियम' म्हणतात, तो वास्तविक 'संभवनीयता सिद्धांत' (Probability Theory) आहे. दाभोळकरांना शक्यता

(Possibility) आणि संभवनीयता (Probability) यातील फरक कळत नाही असे म्हणावे लागते. शक्यता '**असते**' तर संभवनीयता '**घडते**' हा दोन्हींमधील फरक आहे. शक्यतेचे मूल्य १ किंवा ० (शून्य) असते, तर संभवनीयतेचे मूल्य या दोन्हींमधील अपूर्णांक असतो. व्यावहारिक भाषेत बोलायचे तर शक्यता निश्चित माहीत असते, तर संभवनीयता निश्चित माहीत नसते. ती गणिताने काढावी लागते.

Important Notes on Probability Theory

- Probability theory is a branch of mathematics that deals with the probabilities of random events.
- The concept of probability in probability theory gives the measure of the likelihood of occurrence of an event.
- The probability value will always lie between 0 and 1.
- In probability theory, all the possible outcomes of a random experiment give the sample space.
- Probability theory uses important concepts such as random variables, and cumulative distribution functions to model a random event and determine various associated probabilities.

मग दाभोळकर जागीरदारांच्या प्रकरणात 'शक्याशक्यतेच्या नियमाच्या आधारे पंडित शर्मांची मंत्रशक्ती थोतांड आहे हे कसे ठरवितात? याविषयी त्यांचे म्हणणे असे - "नीट समजून घेण्याची बाब ही की त्यामुळे (म्हणजे शर्मांच्या ताइताने जागीरदारांचे काम झाल्यामुळे) पंडित शर्मांची शक्ती सिद्ध होत नाही. भाकिते सिद्ध होण्याचा योगायोगाचा भाग ३ ते ६ टक्के असतो. शंभर व्यक्तींच्या शिक्षणाबद्दल, मुलाबाळांबद्दल, धनस्थितीबद्दल अंदाज ठोकून द्यायचे. हा प्रयोग कोणीही करून बघावा. त्यातील ३ ते ६ टक्के बरोबर येतात... पंडित शर्मांच्या तांत्रिक विद्येने घडवू पाहणाऱ्या शंभर प्रसंगांत काय घडले याचा अभ्यास केल्यास, मी वर लिहिले तेच आढळेल. पण त्याची गरज नसते. ना शर्मांना, ना जागीरदारांना.' येथे दाभोळकरांचे संभवनीयता सिद्धांताविषयीचे घोर अज्ञान उघडे पडले आहे. त्यामुळे त्यांनी अनेक चुका केल्या आहेत. पहिली चूक, पंडित शर्मांनी भाकित केले आहे असे ते समजतात. येथे शर्मांनी भाकित केलेले नाही. त्यांनी जागीरदारांची अडचण दूर करण्यासाठी

ताईत मंत्रून दिला आहे. त्या ताइताचे सामर्थ्य ती अडचण कितपत दूर करते यावरून ठरणार असून, ताइताच्या त्या सामर्थ्याला कुठल्याही तर्कशास्त्राने 'अंदाज' म्हणता येणार नाही. त्यामुळे शंभर माणसांचे शिक्षण, मुलेबाळे, धनस्थिती या विषयीच्या 'ठोकून देण्याच्या' अंदाजाचे दाभोळकरांचे तर्कशास्त्र येथे गैरलागू आहे. ('अंदाज' ज्यावर आपला ताबा नाही अशा वस्तुस्थितीविषयी करण्यात येतो, तर 'मंत्रसामर्थ्य' वस्तुस्थितीत बदल घडवून प्रकट होत असते.) अंदाज आणि मंत्रसामर्थ्य यात दाभोळकरांनी गल्लत केलेली असल्यामुळे जो प्रयोग 'कोणीही करून बघावा' असे ते म्हणतात, तो प्रयोग पंडित शर्माच्या मंत्रसामर्थ्याला लागू होत नाही हे त्यांना कळलेले नाही.

दुसरी दाभोळकरांनी चूक केली आहे ती म्हणजे, पंडित शर्माचे मंत्रसामर्थ्य शून्य ठरविण्यासाठी 'शक्याशक्यतेच्या नियमा'चा आधार घेता येतो हा त्यांचा झालेला गैरसमज. तो नियम येथे कुचकामाचा आहे हेही त्यांना कळलेले नाही. 'संभवनीयता सिद्धांत' जेथे घडणाऱ्या घटनाविषयीचे सर्व घटक माहीत असतात तेथेच उपयोगी ठरतो. येथे जागरदारांचे काम होण्यासाठी काय काय घटना घडणार आहेत व त्या घटना घडवणारे घटक कोणते हे सर्व भविष्यकाळाच्या पोटात दडले असल्यामुळे त्यांची पुसटशीही कल्पना कोणी करू शकत नाही. अशा परिस्थितीत 'संभवनीयता सिद्धांत' कुचकामी ठरतो.

दाभोळकरांची तिसरी चूक म्हणजे 'ठोकून देण्या'चे तंत्र पंडित शर्माच्या मंत्रशक्तीला लागू होते ही त्यांनी स्वतच्च करून घेतलेली समजूत. संभवनीयता सिद्धांतानुसार 'ठोकून देणे' (random guess) खरे ठरण्यासाठी असंख्य प्रयोग करावे लागतात. पण दाभोळकर म्हणतात, "त्याची गरज नसते." ज्यांना शर्माच्या ताइताला संभवनीयता सिद्धांत लागू होतो असे वाटते, त्यांनाच वास्तविक त्याची गरज असते. जागीरदारांना किंवा शर्मांना त्याची गरज नसते. कारण त्याच्या सामर्थ्याचे यश योगायोगाने घडणारी घटना अशा स्वरूपाचे नसून तो त्या ताइताचा अंगभूत गुण आहे असा त्यांचा विश्वास असतो. आणि म्हणून तो एकाच प्रयोगाने सिद्ध होतो. (या प्रकट होतो) आणि तो तसा सिद्धही झाला आहे. तो गुण वा यश असिद्ध ठरविण्यासाठी दाभोळकरांजवळ मात्र कसलेच साधन नाही. म्हणून 'पंडित

शर्माच्या तांत्रिक विद्येने घडवू पाहणाऱ्या शंभर प्रसंगात काय घडले याचा अभ्यास केल्यास मी वर लिहिले तेच आढळेल." अशी जर तर ची भाषा त्यांना वापरावी' लागली आहे. शर्माच्या शंभर प्रयोगांची त्यासाठी वस्तुतःजरुरीच नाही. पहिल्याच प्रयोगात त्यांच्या मंत्रित ताइताने आपले यश शंभर टक्के नोंदविले आहे. योगायोगाने हे घडण्याची संभवनीयता जवळजवळ शून्य आहे. संभवनीयता सिद्धांतानुसार शंभर वेळा एखादे नाणे उडविले असता प्रत्येक वेळी एकच बाजू योगायोगाने वर येण्याची जितकी संभवनीयता आहे तितकीच संभवनीयता शर्माच्या ताइतामुळे जागीरदारांचे काम पहिल्याच प्रयोगात ठरलेल्या मुदतीत योगायोगाने होण्याची आहे. दाभोळकरांनी असा ताईत कुणालाही देऊन आठ दहा दिवसांत कुणाचीही एखादी मोठी अडचण शर्माप्रमाणे पहिल्याच वेळी दूर करून दाखवावी आणि अशा घटना एकाच प्रयोगात योगायोगाने कशा घडतात हे दाखवून द्यावे. शर्माच्या अस्तित्वात नसलेल्या 'शंभर प्रसंगां'ची भाषा करून हवेत कल्पनेच्या वावड्या उठवू नयेत.

दाभोळकरांचे संमोहन प्रक्रियेविषयीचे अज्ञान व मिथ्याकथन

(३) पंडित शर्मानी जागीरदारांच्या मांसभक्षणाच्या अपथ्यामुळे घडलेली चूक निस्तरण्यासाठी जागीरदारांना एकाग्रचित्त करून डोळे मिटून बसायला व चेहऱ्यावर स्पंदने होतील तेव्हा डोळे उघडून हाका मारायला सांगितले. पहिल्या वेळी काहीच घडले नाही. पण खुर्ची मागे जाण्याचा चमत्कार घडला. दुसऱ्या वेळी पुन्हा तसेच करायला सांगितले. तेव्हा मात्र जागीरदारांच्या चेहऱ्यावर स्पंदने होऊ लागली. ती जागीरदारांनी आपल्या दोन्ही हातांनी गाल दाबून धरले तरी थांबेनात. या घटनांची उपपत्ती दाभोळकर संमोहनाच्या सहाय्याने देतात. संमोहनात असे घडू शकते. पण त्यावेळी मनुष्य शुद्धीवर नसतो. येथे जागीरदार पूर्ण शुद्धीवर होते; हे कसे? याला दाभोळकरांचे उत्तर असे की सूचना वगळता ती व्यक्ती शुद्धीवर असते. असे जर असेल तर स्पंदनाची सूचना शर्मानी प्रथम दिली त्यावेळी ती स्पंदने का घडली नाहीत? दुसऱ्या वेळीच का घडली? याचे दाभोळकरांजवळ उत्तर नाही. याचे शर्माजवळ उत्तर आहे. ते उत्तर असे की इष्टदेवतेचा कोप झाला होता. तो कोप जागीरदारांची खुर्ची हिसकावून घेऊन त्या देवतेने प्रकट केला. नंतर देवता शांत झाली व शर्मा व जागीरदार या दोघांवरील सावट दूर झाले. ते दूर झाल्याचे चिन्ह म्हणजेच

जागीरदारांच्या चेहऱ्यावरील स्पंदने. ही स्पंदने इतक्या जोरात घडली, की जागीरदारांनी आपले दोन्ही हात गालावर दाबून धरले तरी ती थांबेनात, आणि हेच सावट दूर झाल्याचे प्रसादचिन्ह आहे हे ओळखून शर्मांनी जागीरदारांना जवळ बोलावून त्यांच्या पाठीवरून हात फिरवला व आता सावट दूर झाले असे ते म्हणाले.

सूचनेने स्पंदने घडली असती तर दोन्ही हातांनी गाल दाबून धरून ती थांबविण्याचा प्रयत्न जागीरदारांनी केलाच नसता हे दाभोळकरांना समजलेले नाही. कारण सूचनेच्या अधीन असलेल्या प्रयुक्ताकडून सूचनाविरोधी कृती कधीच घडत नाही. मग त्यांनी ती थांबविण्याचा का प्रयत्न केला? याचे उत्तर दाभोळकरांजवळ नाही. शिवाय एखादी कृती जेव्हा जाणीवपूर्वक होते, तेव्हा सूचनाकार्य स्थगित होते. जागीरदारांनी दोन्ही हातांनी गाल दाबून धरले ही जाणीवपूर्वक कृती होती. यावेळी सूचनाकार्य, म्हणजे स्पंदने थांबावयास पाहिजे होती. पण ती थांबली नाहीत. ("घट्ट दाबून धरले तरी ती थांबेनात" असे जागीरदार म्हणतात.) ती सूचनेमुळे होत नव्हती हे यावरून सिद्ध होते. या सर्व प्रकारावरून असे म्हणावे लागते की, एक तर दाभोळकरांना संमोहनप्रक्रिया माहीत नाही अथवा ते मुद्दाम खोटे लिहीत आहेत. अथवा दोन्हीही काही अंशी खरे आहे.

(दाभोळकरांना खोटे लिहायला दिक्कत वाटत नाही, ही गोष्ट "तुम्हाला प्रयत्न करावेच लागतील" अशी जोरदार सूचना शर्मांनी जागीरदारांना दुसऱ्या वेळी दिली असे ते खोटेच लिहितात, यावरून स्पष्ट होते. अशी 'जोरदार' सूचना त्यांनी मुळीच दिलेली नाही. शर्मांच्या तोंडी दाभोळकरांनी घातलेले उपर्युक्त वाक्य हे स्वतः दाभोळकरांचेच कपोलकल्पित वाक्य आहे.)

पंडित शर्मा व जागीरदार या दोघांवरही इष्टदेवतेच्या कोपाचे सावट आले होते. ते गेल्यामुळेच जागीरदारांचे काम दुसऱ्या ताइताने झाले. याविषयी - दाभोळकर शर्मांना (किंवा कोणत्याही मांत्रिकाला) आव्हान देतात, की त्यांचे शेकडो कार्यकर्ते सावट लावून घ्यायला तयार आहेत. "लावा सावट, बघू काय घडवता ते !" आव्हान देण्याच्या घाईत दाभोळकर वस्तुस्थितीचे भान हरपून बसले आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की जागीरदारांच्या हातून मांसाहाराचे अपथ्य घडल्यामुळे त्यांच्यावर सावट आले होते. आणि जागीरदारांनी 'परतीच्या वाटा बंद' झाल्याच्या जाणिवेने जेव्हा इष्ट

देवतेला गायत्री मंत्र म्हणून शरण गेले तेव्हा ते सावट गेलेही. त्यामध्ये पंडित शर्मांचाही वाटा होता. कारण त्या अपथ्यामुळे त्यांच्यावरही देवतेच्या कोपाचे हे सावट आले होते. ("तुमच्या-माझ्यावरचं हे सावट गेल" असे ते स्पष्टच म्हणतात.) शर्मांनी देवतेचा हा कोप जागीरदारांच्याच सहकार्यांने घालविला. आणि दोघांवरचे ते सावट गेले. तेव्हा येथे "सावट लावा" अशी आव्हानाची भाषा दाभोळकर कशासाठी करतात ? येथे सावट लावण्याचा दावा कुणी केला आहे? विशिष्ट परिस्थितीत सावट आले आणि गेले. ते कुणी लावलेले नाही. तेव्हा दाभोळकरांना साप साप म्हणून भुई बडविण्याचे कारण काय? एवढे मात्र खरे, की घाबरलेल्या किंवा मानसिक संतुलन बिघडलेल्या माणसाला कल्पनेतही साप दिसू लागतात आणि तो भुई बडवीत सुटतो. (याला इंग्रजीत panic reaction म्हणतात.)

जेव्हा सर्व युक्तिवाद संपतात

देवतेचा कोप घालविण्यापूर्वी एक चमत्कार घडला. जागीरदार बसलेली खुर्ची एकदम मागे गेली आणि ते 'बसल्या अवस्थेतच जमिनीवर आदळले' हे कसे घडले? याविषयी दाभोळकर म्हणतात, "जागीरदारांची खुर्ची धाडकन बाजूला कशी गेली ? खुर्चीच्या मागच्या पायावर लाथ बसली असे ते स्वतःच लिहितात. त्यांचे डोळे त्यावेळी पूर्ण बंद होते हेही त्यांनीच लिहिले होते. खोलीत पंडित शर्मा वगळता कोणीही नव्हते. दाराला जागीरदारांनीच आधी कडी घातली होती. या बाबी एकत्रित पाहिल्यास काय निष्कर्ष निघतो ? विज्ञानाचा नियम सांगतो, भौतिक शक्ती लावल्याशिवाय साधी टाचणीही एक मिलिमीटर इकडची तिकडे जात नाही, मग खुर्ची कशी हलेल? असा चमत्कार कोणी घडवत असेल, तर त्याला आमचे लाख रुपयांचे आव्हान आहे; ते जोपर्यंत कोणी स्वीकारीत नाही तोपर्यंत 'बदमाशी' या शब्दातच याचे वर्णन करावे लागेल. "येथे दाभोळकरांनी केलेले एक खोटे विधान वाचकांच्या निदर्शनास प्रथम आणले पाहिजे. "खुर्चीच्या मागच्या पायावर लाथ बसली असे ते (जागीरदार) स्वतःच लिहितात " असे दाभोळकर म्हणतात. जागीरदार असे मुळीच लिहीत नाहीत. "खुर्चीच्या मागच्या पायावर जोराची लाथ मारावी, तसं झालं" असे जागीरदार लिहितात. 'अमुक मनुष्य हवेत फुटबॉल उडावा तसा उडाला' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा 'अमुक मनुष्य फुटबॉल बनून हवेत उडाला' असे आपल्याला म्हणायचे

नसते. पण दाभोळकर असेच म्हणत आहेत. "लाथ मारावी तसं झालं" असे जेथे जागीरदार म्हणतात, तेथे दाभोळकर "लाथ मारली" असं म्हणतात. दाभोळकरांचे हे विधान एका अर्थाने खरेच आहे. दाभोळकर सुचवितात त्याप्रमाणे शर्मानी लाथ मारली (आणि 'बदमाषी' केली) हे खरेच आहे. पण ती लाथ त्यांनी जागीरदारांच्या खुचींच्या पायावर मारली नाही. तर बुद्धिवादाच्या कंबरेत मारली ही गोष्ट दाभोळकरांचे सर्व युक्तिवाद येथे संपले असल्यामुळे ते लाख रुपयांच्या आव्हानाची भाषा आता करीत आहेत, यावरून स्पष्ट होते. (लाख रुपयांच्या आव्हानाची भाषा या लोकांनी काढली की त्यांची मती कुंठित झाली आहे, बुद्धी चालेनाशी झाली आहे, असे बेशक समजावे.) दाभोळकर आता मुद्यावरून गुद्यावर आले आहेत. पण त्यांचा हा गुद्दा हवेतच विरला आहे. ते कसे हे शर्माच्या खोलीचे व या प्रसंगाचे बारकाईने निरीक्षण केले असता कळेल.

आमचेही एक लाख रुपयांचे आव्हान आहे, स्वीकारा !

जागीरदार शर्माच्या खोलीचे वर्णन करताना लिहितात, "संध्याकाळनी वेळ. खोलीत आम्ही दोघेच होतो. पंडित शर्मा आणि मी. एका लोखंडी कॉटवर पथारी टाकून भिंतीजवळील लोडाला टेकून पंडितजी बसले होते. त्यांच्या पलंगाजवळ एक छोटेसे गोल टेबल होते. त्यावर इष्ट देवतेची छोटीशी पानाफुलांनी जवळजवळ झाकलेली अशी मूर्ती होती. तिथून थोड्याच अंतरावर एक लोखंडी फोल्डिंग खुर्ची होती. मी त्या खुर्चीवर बसलो होतो."

पलंगाजवळचे गोल टेबल शर्माच्या समोरच असले पाहिजे. कारण जागीरदार म्हणतात की उदबत्ती लावून, समई पेटवून व नमस्कार करून त्या टेबलावरील इष्टदेवतेची शर्मा आराधना करीत होते. त्या टेबलापासून थोड्या अंतरावर असलेल्या खुर्चीवर जागीरदार बसले होते. आता दाभोळकर सुचवीत असलेली 'बदमाषी' करण्यासाठी पंडित शर्माना डोळे मिटलेल्या जागीरदारांना न कळता पलंगावरून उठून, मधले टेबल ओलांडून जागीरदारांच्या खुर्चीच्या मागच्या पायावर 'बसल्या अवस्थेतच ते जमिनीवर आदळण्याइतकी जोराची लाथ मारून परत पूर्वीप्रमाणे पलंगावरील भिंतीजवळील लोडाला टेकून बसले पाहिजे हे शक्य आहे काय ?

पहिली गोष्ट म्हणजे डोळे मिटून खुर्चीवर बसलेला मनुष्य खाली पडताच डोळे उघडतो, ही स्वाभाविक क्रिया आहे. तेव्हा पंडित शर्मांनी खुर्चीला जोराची लाथ मारून जागीरदारांना 'बसल्या अवस्थेतच' जमिनीवर पाडले तर जागीरदार लगेच डोळे उघडतील व शर्मांना हे करताना रंगे हात पकडतील ही गेष्ट एखादे शेंबडे पोरसुद्धा सांगू शकेल आणि ही गोष्ट न कळण्याइतके पंडित शर्मा निर्बुद्ध होते असे दाभोळकरांशिवाय कोणीच म्हणणार नाही. अशी 'बदमाषी' जागीरदारांना न कळता करणे केवळ अशक्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे 'खुर्ची मागच्या भिंतीवर जाऊन आपटली' असे जागीरदार म्हणतात. म्हणजे पुढच्या बाजूने लाथ मारली. तरच असे घडू शकत असल्यामुळे शर्मांनी समोरून लाथ मारली असे ठरते. आता पुढे पाय सोडून खुर्चीवर बसलेल्या माणसाला (पुढे पाय सोडूनच कोणीही खुर्चीवर बसतो) न स्पर्श करता अशी लाथ खुर्चीला, ती मागच्या भिंतीवर आदळण्यासारखी, कशी मारणे शक्य आहे? आणि तीही खुर्चीच्या मागच्या पायावर मारावी तशी ? कारण जागीरदार तसे म्हणतात. तेव्हा हा बदमाषीचा पंडित

शर्मावर आरोप करून दाभोळकर कुणाला फसवू पाहत आहेत?

स्वतःजागीरदारच म्हणतात, की जमिनीवर आदळल्यावर त्यांनी पंडितजीकडे पाहिले. तेव्हा ते त्यांना लोडाला टेकून बसलेलेच दिसले. इतकेच नव्हे, तर या प्रकाराने तेही थोडे घाबरल्याचे त्यांना दिसून आले. शर्मांनी बदमाषी केल्याची दाभोळकरांची थाप त्यांच्या लाख रुपयांच्या आव्हानाच्या जोरावर खपेल अशी त्यांची समजूत असेल तर ती त्यांनी प्रथम डोक्यातून काढून टाकावी. त्यांना आमचेही एक

लाख रुपयांचे आव्हान आहे, की त्यांनी अशा प्रकारची बदमाषी वरील परिस्थितीत यशस्वीपणे करून दाखववावी. या आव्हानासाठी लागणाऱ्या सर्व वैधानिक अटी आम्ही पाळावयास तयार आहो. हे आव्हान त्यांनी स्वीकारले नाही, तर त्यांचे लाख रुपयांचे आव्हान हे बुद्धिवादी थापा मारण्यासाठी व त्या खपविण्यासाठी उभे केलेले केवळ एक बुजगावणे आहे, असे येथून पुढे समजण्यात येईल.

हे घ्या पंडित शर्मांच्या बाजूने पुरावे

पंडित शर्माचे प्रकरण जागीरदारांनी येथेच संपविलेले नाही. 'पाऊलखुणा' या त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी शर्माचा आणखीही एक किस्सा सांगितलेला आहे. तो सगळा येथे तपशिलात जाऊन सांगण्याची जरुरी नाही. त्यातील मुख्य मुद्दा 'देवतेचा कोप होणे' ही काल्पनिक गोष्ट नाही, हा आहे. हे दाखवून देणाऱ्या आणखी एका घटनेचा उल्लेख जागीरदारांनी त्या प्रकरणात केला आहे. पंडित शर्माच्या कोणा नंदलाल नावाच्या एका शिष्याने आपल्या इष्टदेवतेला प्रसन्न करून घेऊन आपला स्वार्थ (लता मंगेशकरकडून १५ लाख रुपये उकळण्याचा) अवैध मार्गाने साधण्याचा डाव रचला. परंतु ती इष्ट देवता त्याच्या या नीच कृत्यावर रूष्ट होऊन कायमची निघून गेली. मात्र जाण्यापूर्वी ती त्याला फणफणाच्या तापाने बिछान्यावर आडवा करून गेली, असा किस्सा जागीरदारांनी पंडित शर्माच्या तोंडून सांगितलेला आहे.

या केवळ इसापनीतीतील गोष्टी नाहीत, असे स्वानुभवाने प्रस्तुत लेखकाचे मत झाले असून लेखविस्तार होणार असला तरी याविषयीचा लेखकाचा एक अनुभव येथे सांगितल्यावाचून राहवत नाही. काही वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकाला स्वतःच्या गावी विशिष्ट ठिकाणी एक प्लॉट पाहिजे होता. त्या ठिकाणी मोकळे प्लॉट भरपूर होते. पण ते सर्व मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे कोणीही ते विकत द्यायला तयार नव्हते. मागेल ती किंमत द्यायला तयार असूनही व कित्येक वर्षे प्रयत्न करूनही लेखकाला प्लॉट मिळत नव्हता. प्लॉटची तर फार गरज होती.

लेखक अगदी अगतिक झाला होता. याच सुमारास लेखक काम करीत असलेल्या संस्थेत योगायोगाने एक तांत्रिक आला. लेखकाने आपली अडचण त्याला सांगितली व त्यावर काही तांत्रिक उपाय आहे का, असे विचारले. त्याने 'आहे' असे

सांगितले व काही आकृती व मंत्र असलेला एक पातळ तांब्याचा चौकोनी पत्रा लेखकाला दिला व एक साधा विधी त्यावर करण्यास सांगितले. दररोज हा विधी केल्यास सहा महिन्यात तुम्हाला प्लॉट मिळेल असे त्याने सांगितले. लेखकाने तसे केले आणि अहो आश्चर्यम् ! तीनच महिन्यांनी एक गृहस्थ लेखकाकडे आले आणि म्हणाले, 'डबल प्लॉटस् आहेत. ताबडतोब विकायचे आहेत. घेणार का?'

आंधळ्याला एकाऐवजी दोन डोळे मिळाले तो डबल प्लॉट अगदी मोक्याच्या ठिकाणी होता. दुसरे आश्चर्य म्हणजे तो प्लॉट लेखकाला विकल्यानंतर काही दिवसांनी तेच गृहस्थ लेखकाला परत प्लॉट विकत देता का? असे विचारू लागले ! (बेळगाव दै. तरुण भारतचे वृत्तसंपादक ग. गो. राजाध्यक्ष यांनाही ते हल्ली राहत असलेली मोठी वास्तू मिळण्याबाबत आलेला असाच विलक्षण अनुभव त्यांनी प्रस्तुत लेखकाला सांगितला आहे. भाड्याच्या घरात राहणाऱ्या आपणाला स्वप्नातही मोठी वास्तू मिळेल असे वाटले नव्हते, असे ते म्हणाले.)

खुर्चीच्या चमत्कारासारखा आणखी एक चमत्कार

जागिरदारांनाआलेल्या खुर्चीचा अनुभव हा इष्टदेवतेच्या कोपाचा परिणाम असे वर म्हटले आहे. अशाच प्रकारचा अनुभव माझे निपाणीचे एक डॉक्टर मित्र जे. जे. निर्मळे यांना आल्याचे त्यांनी मला सांगितले आहे. अगदी थोडक्यात तो अनुभव असा एकदा त्यांच्या दवाखान्यात एक मांत्रिक आला होता. बोलण्याच्या ओघात डॉ. निर्मळेंनी त्याला भुताच्या अस्तित्वाविषयी विचारले. ते निस्संशय आहे असे उत्तर मिळताच, 'मला दाखवाल का?' असे निर्मळेंनी त्याला विचारले. त्या गोष्टीला तो तयार झाला. एका अमावस्येच्या मध्यरात्री दोघेही गावाबाहेरील विद्यामंदिर हायस्कूलच्या पूर्वेकडील स्मशानभूमीत गेले. तेथे तो मांत्रिक निर्मळेना भूत काही दाखवू शकला नाही. पण निर्मळेंना भुतापेक्षा मोठा चमत्कार पाहावयास मिळाला. तो मांत्रिक काही मंत्र पुटपुटत असतानाच एकदम हवेत दहा-बारा फूट उंच फेकला गेला व कोलांट्या उड्या खात जमिनीवर येऊन आदळला. हा तेथील मृतात्म्यांचा कोप असावा काय? हे मात्र त्या मांत्रिकाने सांगितले नाही. पण तसा निष्कर्ष काढण्यास जागा आहे. (हा अनुभव सांगताना डॉ. निर्मळेंनी There is absolutely no exaggeration in this असे म्हणाले.)

"भौतशक्तीशिवाय साधी टाचणीही एक मि. मि. इकडची तिकडे जात नाही." हा विज्ञानाचा नियम वरीलप्रमाणेच धाब्यावर बसविणारा एका तंत्रिकाचा प्रयोग निपाणीतच प्रसिद्ध निपाणीकरांच्या वाड्याच्या भवानी मंडपाच्या पटांगणात प्रस्तुत लेखकाने पाहिला आहे. हा खास प्रयोग निपाणीतील काही प्रतिष्ठितांसाठी त्या तांत्रिकाने खासगीत केला होता. या प्रयोगात स्टेनलेस स्टीलची प्लेट ठेवलेल्या अवस्थेतच वेगाने १५ फुटाइतके अंतर सरपटत धावली होती. (येथेही त्या तांत्रिकाने इष्ट देवतेची पूजा आराधना केली होती.) या प्रयोगात तार, केस, लोहचुंबक वा अन्य कृत्रिम साधन वापरले नसल्याची खात्री करण्यात आली होती. हा प्रयोग उघड्यावर व खुला होता.

वाचकांच्या प्रतिक्रिया

डॉ. दाभोळकरांच्या लेखावर वाचकांच्या ज्या प्रतिक्रिया नंतर प्रसिद्ध झाल्या त्यावरून दाभोळकर आपले म्हणणे सर्वच वाचकांना काही पटवू शकले नाहीत हे स्पष्ट झाले. मात्र श्री. सुभाष के. देसाईंसारखी अतींद्रिय घटना सत्य मानणारी व्यक्ती दाभोळकरांच्या फसव्या व भोंगळ युक्तिवादाला बळी पडली आणि जागीरदार पंडित शर्मांकडून गंडवले गेले ही त्यांची थाप खरी मानती झाली. मात्र चमत्कार खोटे ठरविण्यासाठी 'हा अट्टाहास का?' असा खडा सवाल करणारे व 'तांत्रिक सिद्धी सत्य आहेत' असे बजावणारे अप्पासाहेब गुरवसारखे चोखंदळ वाचकही निघाले. 'सब घोडे बारा टक्के' ठरविण्याच्या अंधश्रद्धानिर्मूलनवाद्यांच्या आंधळ्या बुद्धिवादी युक्तिवादाला बळी न पडणारे डोळस वाचकही मोठ्या संख्येने आहेत, हे ही नसे थोडके!

टीप :- पंडित शर्मा हृदयाच्या बीमारीने आजारी असल्यामुळे काशीहून

मुंबईला उपचारासाठी आले होते. "त्यांचे तंत्रशास्त्र अशा रीतीने त्यांना स्वतला उपयोगी पडत नव्हते तेथे ते इतरांना काय उपयोगी पडणार?" हा दाभोळकरांचा या संबंधीचा प्रश्न अज्ञानमूलक आहे. पंडित शर्मानी तंत्रशास्त्र सर्व गोष्टींवर जालीम उपाय आहे, असा कधीच दावा केला नव्हता. तसेच "मांसभक्षण करणे आणि एखादी भविष्यातील गोष्ट न घटणे याचा साध्या सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीने

विचार केला तरी कार्यकारणभाव शून्य आहे" हा दाभोळकरांचा आक्षेपही अज्ञानमूलक आहे. पंडित शर्माचा प्रयोग हा सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीच्या दृष्टीने होत नव्हता, तर तंत्रशास्त्राच्या विधीच्या दृष्टीने होत होता, हे दाभोळकर विसरतात. जागीरदारांचा 'पाऊलखुणा' मधील तांत्रिक चमत्काराचा अनुभव बुद्धिवादाचा सर्व बाजूंनी बोजवारा उडवणारा आहे ही वस्तुस्थिती असले पोकळ व अज्ञानमूलक आक्षेप घेतल्याने दडून राहत नाही. पण जागीरदारांना हा एकाच मांत्रिकाचा अनुभव आलेला नाही. आपल्या पाऊलखुणाच्या पृष्ठ १२८ ते १३१ वर त्यांनी खर्डेकर (शिवाजी विद्यापीठाच्या खर्डेकरांचे संबंधिक) या आणखी एका मांत्रिकाचा आलेला आपला आणखी एक विलक्षण अनुभव सांगितला आहे. हा चमत्कार जागीरदारांचे सिनेव्यवसायबंधू विनायक यांच्या कोल्हापुरातील राहत्या घरात घडला. दृश्य चौरंग, दोन हाडे, चिरलेले लिंबू, हिरव्या मिरच्या, मध्यभागी ज्योत. ज्योतीत एका 'पायाळू' गुराख्याच्या पोराला आपल्या मामाचा कुऱ्हाडीने खून केल्याचे हुबेहूब दिसल्याचे जागीरदारांनी म्हटले आहे. या चमत्काराने आपण चक्रावून गेलो. आपली झोप उडाली, असे ते म्हणतात. (आपल्या मामाचा खून झाल्याचे कोल्हापुरात कोणालाच माहीत नव्हते, असेही ते म्हणतात.)

आता या गुराख्याच्या पोराला जागिरदारांच्या मामाचा कुऱ्हाडीने खून केल्याचे हुबेहूब दृश्य कसे दिसले? हाडे, लिंबू, हिरव्या मिरच्या, 'पायाळूपणा इत्यादी गोष्टी नसताना किंवा खर्डेकरासारखा एखादा मांत्रिक जवळ नसतानासुद्धा कुणालाही माहीत नसलेल्या एखाद्या घटनेचे हुबेहूब दृश्य दिसू शकते; ते कसे, याविषयाची माहिती प्रस्तुत लेखकाने स्वानुभवावर आधारित प्रयोगासह 'विज्ञान आणि चमत्कार' या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणात दिली आहे. तात्पर्य, जागिरदारांनी वर्णन केलेली घटना असंभवनीय समजण्याचे कारण नाही. विज्ञानाच्या निकषावर सत्य ठरणाऱ्या व बुद्धिवादाचा बोजवारा उडवणाऱ्या अनेक घटना त्या ग्रंथात दिलेल्या आहेत.

क्रमशः